आत्मदीपो भव !

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

# ग्रंथालय पदाधिकारी आणि कर्मचारी

## यांच्यासाठी

# क्षमता संवर्धन कार्यक्रम



ग्रंथालय म्हणजे विचारांच्या आदानप्रदानाचे केंद्र. समाजात वाचन संस्कृतीचा प्रचारआणि प्रसार करण्याचे काम ग्रंथालयांच्यावतीने केले जाते. माहिती, ज्ञान, मनोरंजन आणि जिज्ञासापूर्तीचे साधन म्हणून ग्रंथांकडे पाहिले जाते. बौद्धीक विकासाचे शक्तीकेंद्र आणि सामाजिक विकासाचे ऊर्जाकेंद्र म्हणून प्रबोधिनीचे हे ग्रंथालय कार्यरत आहे.




## ग्रंथालयाच्यावतीने राबविण्यात येणारे उपक्रम

- व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, वाचक-प्रकाशक संवाद सभा.
- शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रबोधन वाचनमाला.
- वाचन चळवळीतील घटकांसाठी नियमित प्रशिक्षण कार्यक्रम.

## प्रशिक्षण कशासाठी ?

प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेचा आणि कार्यपद्धतीचा विकास व्हावा या उद्देशाने ग्रंथालय चळवळीतील सर्व घटकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते.

## प्रशिक्षणाचे महत्व:

मागील चार दशकांपासून प्रशिक्षणाला पूर्वी नव्हते एवढे महत्व आज अनेक क्षेत्रात आले आहे.





प्रशिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात अमूलाग्र बदल झाला असून, प्रशिक्षणावर होणारा खर्च आता खर्च न मानता, ती एक गुंतवणूक आहे असे मानले जाते.

प्रशिक्षणामुळे अनेक सामाजिक संस्थांच्या कार्यक्षमतेत भर पडत असून संस्थांच्या सर्वांगिण विकासातही फार मोठा बदल होताना दिसत आहे. नवनवीन तंत्रज्ञान, कामाच्या बदलणाऱ्या पद्धती, काम करण्याची शैली, प्रत्येक क्षेत्रातील वाढती स्पर्धा आणि आव्हाने हे समजून घेण्यासाठी प्रशिक्षणाच्या माध्यमातून अद्ययावत ज्ञान मिळविण्याची गरज आहे.

ग्रंथालय हे एक असे क्षेत्र आहे की, या क्षेत्रात काम करत असतांना स्वत:ला अद्ययावत ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. संपर्क आणि प्रसार माध्यमांच्या वेगवान प्रगती मुळे पुस्तके ‘वाचण्याची‘‘ सवयच हळूहळू लोप पावत चाललीआहे. छापील पुस्तकांपेक्षा ‘स्क्रीन‘‘ वरील अक्षरांकडे वाचकांचा ओढा अधिक आहे. तंत्रज्ञानाच्या या वाढत्या प्रसाराचे फायदे आणि तोटे दोन्ही आहेत. त्यातील संतुलन साधण्याची गरज आहे. ग्रंथालयांच्या माध्यमातून हे संतुलन कसे राखले जाईल याचे प्रशिक्षण संबंधितांना मिळाले तरच वाचनसंस्कृती पुन्हा नव्याने समृध्द होईल !

## प्रशिक्षण कोणासाठी ?

- सार्वजनिक ग्रंथालयांचे अध्यक्ष, कार्यवाह आणि ग्रंथालय आस्थापनातील पदाधिकारी.
- सार्वजनिक ग्रंथालयांचे ग्रंथपाल व इतर कर्मचारीवृंद.
- शालेय, महाविद्यालयीन ग्रंथपाल व इतर ग्रंथालयीन कर्मचारीवृंद.

## प्रशिक्षणातील विषय :

- ग्रंथालयांची ध्येय, धोरणे व विकास.
- ग्रंथालयांचे आर्थिक व्यवस्थापन.
- ग्रंथालये अधिक समाजाभिमुख करण्यासाठीचे उपाय.
- सार्वजनिक ग्रंथालयांचे व्यवस्थापन व वाचकाभिमुख उपक्रम.
- ग्रंथालयात संगणकीकरणाचा सुयोग्य वापर.
- माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रंथालयांची उपक्रमशीलता.
- सामाजिक जिवनात सार्वजनिक ग्रंथालयांचे योगदान, बदलत्या काळातील भूमिका.
- बदलती कार्यसंस्कृती.
- ग्रंथांचे जतन आणि संवर्धन.
- वाचन चळवळीचा प्रसारआणि प्रचार.
- कार्यालयीन व्यवस्थापन, कार्यालयीन शिस्त.
- परस्पर संबध, ताणतणाव व्यवस्थापन.
- वेळेचे महत्व.
- संवाद कौशल्ये.

## इतर उपक्रम :

### निवासी पाठ्यवृत्ती :

१. विविध विषयांत रुची असणाऱ्या, अभ्यास करणाऱ्या व्यक्तींनी येथे येऊन संशोधन व अभ्यास करावा व आपल्या लेखनाद्वारे त्या त्या विषयातील अनेकविध पैलू पुस्तक रुपाने प्रकाशीत करावेत हा या योजनेचा मुख्य हेतू आहे.

### वास्तव-दर्शन पाठ्यवृत्ती :

पत्रकारांमध्ये सृजनशीलता विकसित करण्याचा अभिनव उपक्रम

१. उगवत्या पत्रकारांमध्ये संशोधनवृत्ती, सामाजिक व राष्ट्रीय प्रश्नांची जाणीव आणि सृजनशीलता व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, या उद्देशाने ही पाठ्यवृत्ती देण्यात येते. विविध सामाजिक प्रश्नांचा सांगोपांग अभ्यासही या निमित्ताने समाजापुढे मांडला जातो.

## प्रशिक्षणांची वैशिष्ट्ये :

१. केशवसृष्टी, उत्तन येथील निसर्ग सुंदर, अत्याधुनिक आणि सुसज्ज ज्ञान-नैपुण्य केंद्र.

२. उत्तम निवास आणि जेवणाची व्यवस्था.

३. प्रात्यक्षिकांसह चर्चात्मक पद्धतीने विषयांची मांडणी, तज्ञ मार्गदर्शक.

## प्रबोधिनीचा प्रशिक्षण परिसर

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे ज्ञान-नैपुण्य केंद्र हे १५ एकरांचे हिरवाईने नटलेले आणि टेकड्यांच्या मधोमध वसलेले एक निसर्गसुंदर ठिकाण आहे. निवासी प्रशिक्षणाचा अविस्मरणीय अनुभव देणाऱ्या या शांत परिसरातील ग्रंथालय व इतर प्रशिक्षण सुविधा स्वयं-शिक्षणाला प्रेरणा देतात आणि मनाला अंतर्मुख करतात.











## संपर्क:

**दिलीप शिवराम नवेले**

ग्रंथपाल,

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, संचालित

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्र ग्रंथालय (शासनमान्य)

दूरध्वनी क्र.: ९९६७४२९४५६ | dilipn@rmponweb.org

**मुंबई कार्यालय (नोंदणीकृत)**
**१७, चंचल स्मृती, गं.द.आंबेकर मार्ग,**
**श्रीराम इंडस्ट्रीयल इस्टेट समोर, वडाळा,**
**मुंबई – ४०० ०३१, महाराष्ट्र, भारत.**
**दूरध्वनी : +९१ – २२ – २४१३ ६९६६ /**
**२४१८ ५५०२ / २४१५ ६७२५**
**ई मेल -rmpchanchal@rmponweb.org**

**ज्ञान–नैपुण्य केंद्र (प्रशिक्षण संकुल)**
**केशव सृष्टी, उत्तन, एस्सेल वर्ल्ड रोड, भाईंदर (पश्चिम)**
**जि. ठाणे – ४०१ १०६, महाराष्ट्र, भारत.**
**दूरध्वनी : +९१ – २२ – २८४५ ०१०१ / २ / ३ / ६**
**ई मेल -samparka@rmponweb.org**